REIKI VIDYA NIKETAN

सर्वे: सन्तु निरामया:

# रेकि ब्रह्म



वर्ष ९वे अंक ३रा । डिसेंबर २०२०

# कालिंदी मठाची माय गेली.



संपादकिय

१२ नोव्हेंबरची सकाळ. दिवाळीच्या आधीचा वसुबारसचा दिवस. त्यात गुरूवार. नुकतेच कैलाशच्या गच्चीत अग्निहोत्र झाले होते. अग्निहोत्र अजूनही पेटलेलेच होते. आम्ही चार-पाच जण अग्निहोत्राभोवती बसून आनंद अनुभवत होतो. अचानक नाना अर्जुन धावतच गच्चीवर आले. धापा टाकतच होते. म्हणाले, आपल्या कालींदी आणि शंभूच्या गळ्याभोवती दावणीच्या दोराचा फास लागला आहे. आणि पुढचे काही विचारायच्या आधीच नाना म्हणाले, दोघेही गेले आहेत एक क्षण आम्ही सगळेच सुन्न झालो. कालींदी गेली? छे, शक्यच नाही. कालींदी मठाचा प्राण आहे. असे कसे विपरित होईल आणि तेही वसुबारसच्या दिवशी? हा तर गाई-बैलांचा सण. आज आम्ही गोशाळेतील आमच्या गाईंना ओवाळायचे, त्यांची पूजा करायची, त्यांना त्यांचे लाडू भरवायचे असे नियोजन केले होते. आणि अशी अचानक कालींदी गेली? आणि ती सुद्धा नुकत्याच ३-४ महिन्यापूर्वी जन्मलेल्या आपल्या लाडक्या शंभूला घेऊन? शक्यच नाही. आम्ही सगळेच धावत पळत गोशाळेत पोहोचलो.

गोशाळेत कालींदीची आणि शंभूची स्वतःची खास जागा होती. तेथे पाहतो तो एक भयानक दृश्य नजरेला पडले. माय-लेक दोघेही एकमेकांच्या गळ्यात गळे घालून निश्चिष्ट पडले होते. कालींदीच्या नावाने आम्ही सर्वांनीच आक्रोश केला. गोशाळेच्या बाजूलाच असलेल्या हात व भांडी धुण्याच्या जागेवर हात धुवायला गेलो कि मी नियमित कालींदीला हाक मारायचो, "कालींदी, कशी आहेस ग?" आणि माझा आवाज ऐकताच ती जागच्या जागी खाडकन उभी राह्यची आणि वळून पाहायची आणि हंबरायची. पण आज आम्हा कोणाच्याच अगदी आक्रोशालासुद्धा ती दाद देत नव्हती. का ग कालींदी, एवढी रागावलीस तू माझ्यावर? अग तुझ्या रागावण्याची पण एक अदा होती त्याची जाण होती आम्हाला. मठात पाऊल टाकल्या टाकल्या आम्ही पळायचो पहिले स्वामींच्या दर्शनाला आणि मग ताबडतोब पाय वळायचे ते गोशाळेत कालींदीच्या दर्शनाला. दोन भेटींमध्ये जर बराच काळ गेला असेल तर कालींदी उभी राह्यची पण मान वळवून. आपला अनुराग दाखवायची ती. मग तिला खूप मनवायला लागायचे. तिच्या मानेवरून हात फिरवायला लागायचा आणि अचानक कालींदीचा हा गुस्सा विरघळून जायचा. मग ती स्वतःच मान वर करून आपल्या तोंडावर हात फिरवायला सांगायची जणू. आणि मग तिच्या डोळ्यांतून होणारा तो अश्रुपात. कोठल्याही साधकाला पाह्यले कि तिला खूप भरून यायचे. तिच्या करूणामय डोळ्यांतून मग अश्रुंच्या धारा निघायच्या. आता हे सगळे संपले. मठात स्वामींच्या शिवाय आपली कोणीतरी आईच्या मायेने वाट बघत असते ही कल्पनाच मला मठाकडे धाव घ्यायला उद्युक्त करायची. आता आपली वाट मठात कोण पाहणार. आईच्या मायेने डोळ्यांतून अश्रु कोण पाझरवणार? **ती मठाची गाय नव्हती, माय होती ती.** काय ऋणानुबंध होते ह्या दत्ताच्या गिरनारवरून आलेल्या माऊलीशी आपले? गिरनारच्या मातीत जन्मलेल्या ह्या भाग्यवान गाईने देवरूखच्या कुशीत आपला देह जिरवावा हा आपल्या मठाचा, देवरूखचा सन्मान आहे.

लॉकडाऊनच्या काळात तिने जन्म दिला शंभूला. आणि कालींदी खूप आजारी झाल्याची बातमी आमच्या कानावर आली. सगळेच हादरलो आम्ही. कालींदीला कोठलाही उपचार कमी पडू नये म्हणून मठाचे सगळे व्यवस्थापन त्या कठीण काळातही ठामपणे उभे राहीले. नाना ठिकाणच्या पशुवैद्यांना संपर्क झाले, देवरूखच्या लोकांनी कमालीची काळजी घेतली कालींदीची. आपल्या स्वत:च्या जीवाचे धोके पत्करून कोरोनाच्या भरामध्ये एका दिव्य गाईसाठी कासावीस होऊन मठात धाव घेऊ लागले. बातमी पसरताच किती साधकांनी भारतभर आणि अगदी दूरच्या अमेरिकेत सुद्धा आपले देव पाण्यात बुडवून स्वामींना साकडे घातले असेल त्याची गणनाच नाही. कालींदी सगळ्यांच्याच जीवांना जीव लावून होती. आणि श्रद्धेच्या या अफाट सामर्थ्याने कालींदी पूर्ण बरी झाली. शंभूला चाटायला लागली. शंभू नावाप्रमाणेच पवित्र आणि खट्याळसुद्धा. देवरूखबाहेरच्या साधकांना एकच ध्यास लागला होता. कधी एकदा मठात जातो आणि शंभूच्या बाळलीला पाहतो. आपल्याच घरात जन्मलेल्या बाळाला बघायची ओढ लागते ना अगदी तशी ओढ शंभूला पाह्यण्याची लागली. मग देवरूखचे साधक कालींदी आणि शंभूचे फोटो पाठवून आपल्या दूरच्या साधकांची तहान भागवू लागले. पण आता हे सगळे साधक येतील त्यांना शंभू कोठून दाखवायचा? एखादी सुंदर कळी उमलायच्या आधीच खुडली जावी तसे काहीसे घडले. स्वामींच्या मनात काय होते कोण जाणे?

कालींदी गेली आणि गोशाळेची शान हरपली. कालींदी गेल्यानंतर सगळ्या गाईंनी फोडलेला हंबरडा आजही अंगावर शहारे आणतो. कालींदीच्या ज्येष्ठ पाड्याने (मित्राने) केलेला शोक आठवतो. आपल्या आईपासून केवळ काही फुटांवर बांधलेल्या धिप्पाड मित्राने आपले दावे तोडून आईकडे धाव घेण्याचा प्रयत्न केलेला आम्ही नंतर सी,सी,टि.व्ही,च्या पडद्यावर पाहीला त्यावेळेला आपणच बांधलेल्या बंधनांत आपणच कसे हतबल होतो ते समजले. आपल्या आई आणि भावाच्या मृत्युनंतर एकट्या पडलेल्या मित्राच्या भावना पाहून असे वाटते कि आपण माणुसकी– माणुसकी जी म्हणतो ती कधीच गमावून बसलो आहोत, परंतु गाई–बैलांनी मात्र अजूनही आपल्या नात्यांच्या रेशमी बंधांना दुरावले नाही. कालींदी सगळ्या गोशाळेची अनभिषिक्त सम्राज्ञी होती हे नि:संशय. केवळ गोशाळेचीच नव्हे, ती सगळ्या मठाचीच सम्राज्ञी होती हेच खरे. तिचा तो सामर्थ्यवान देह, तिची ऐटबाज चाल, तिची प्रेमळ आणि आश्वासक नजर आणि त्यातून वाहणारा तो करूणेचा सागर, सगळेच कसे लोभसवाणे. मला असे वाटायचे कि स्वामी प्रत्यक्ष कालींदीच्या रूपानेच मठात वावरायचे. मठाच्या समोरच आपल्याच एका साधकाने, स्वामीभक्ताने घरासाठी भूमि–पूजन केले. त्यावेळेला गाईचे खूर जमिनीवर रांगोळीने काढायचे असे ठरले. पण त्याचवेळेला नेमकी चरण्यासाठी कालींदी इतर गायींबरोबर जवळच्याच कुरणात आली ते मी पाहीले. म्हटले, खोटी पावले कशाला? आपली कालींदी प्रत्यक्षात येऊन आपली पवित्र पाऊले उमटवेल कि त्या जागेवर! नुसती हाक मारली, कालींदी. आणि ती सामर्थ्यवान देवी आपल्या पायाने चालून त्या जागेवर आली आणि तिने सगळ्या प्लॉटवर अशी फेरी मारली कि पाहत राहवे. त्या साधकाचे, त्या जागेचे, त्या परिवाराचे कल्याण झाले. त्यावेळची कालींदीची जी देहबोली होती, तिच्या नजरेतील आश्वासकता होती ती आजही विसरणे कठीण आहे.

आता गोशाळा असेल, गोशाळेचे कारभारही चालू राहतील. पण ह्या सगळ्यात सगळ्या जगावर प्रेम करायला आलेली कालींदी नसेल. जाण्याचा दिवसही बघा कसा निवडला ह्या देवतेने! गुरूवारची पहाट, वसुबारसची सुरूवात, दिवाळीचा आदला दिवस आणि माझे तिथे असणे.. थांबली होतीस का ग कालींदी माझ्यासाठी? अस्वस्थ जगाला सावरण्यासाठी आली होतीस ना ग तू? मग का गेलीस एवढ्या लवकर? आपल्या मिशनचा भाग होतीस ना ग तू? मग असे मिशन अर्धवट सोडून असेच जायचे का ग? खरे सांगू गेले काही वर्षे मी मठ तुझ्यावर सोडून जग भटकायला निघायचो. आता कोणाकडे सोपवायचा मठ? कालींदी तू पुन्हा ये ग. जगाला तुझ्या प्रेमाची, वत्सलतेची गरज आहे. प्रचंड सामर्थ्य असूनही प्रेमळ कसे राह्यचे हे आम्ही तुझ्याकडून शिकत होतो. थोडेसे सामर्थ्य आले तरी गर्वाने फुगुन जाणाऱ्या माणसांना तू एक नव्या जीवनाचा मंत्र द्यायला आली होतीस ना? ये, पुन्हा तू ये. कोठल्याना कोठल्या तरी स्वरूपात तू पुन्हा येशील. स्वामी ते करतील यात मला तिळमात्र शंका नाही, कालींदी!

अजित सर
दि. २२ नोव्हेंबर २०२०





(भाग ३७वा)

# तेलंग स्वामी

## एक अद्भुत अस्तित्व

### अनुवादक – सौ. शुभदा गर्गे, नाशिक

त्याच दिवशी, तिसऱ्या प्रहरी काही संन्याशी येऊन स्वामीजींशी विचार–विमर्श करू लागले. स्वामीजींकडे असे संत महात्मे कायम येत असत व आपल्या शंकांचे निवारण करून घेत असत. संन्यासी जाताच अचानक जोरदार पाऊस सुरु झाला. उमाचरणजींनी घरी जाण्यास परवानगी मागितली, पण स्वामीजींनी त्यांना बसून राहण्यास सांगितले.

पावसाचा जोर वाढत होता. रस्त्यावर पाणी साचू लागले. विजांचा कडकडाट व मेघगर्जना होऊ लागली.

दोन तास झाले तरी पाऊस थांबेना. उमाचरणजींनी विचार केला बहुतेक स्वामीजी आश्रमातच ठेऊन घेतील.

तेवढयात स्वामीजी म्हणाले, "आता तू जाऊ शकतोस."

हे ऐकताच उमाचरणजी बिचकले. पावसाचा जोर वाढतच होता. ठिकठिकाणी पाणी साचले होते. अशा भयंकर वातावरणात घरी कसे जाणार, हा विचार करून गयावया करीत ते स्वामीजींना म्हणाले, "थोडा पावसाचा जोर कमी..."

त्यांचे वाक्य पूर्ण व्हायच्या आधीच स्वामीजींनी त्यांना ताबडतोब निघण्यास फर्मावले.

आता निघण्याशिवाय पर्याय नव्हता. बाहेर पडताच त्यांना मंगलदास भेटले. उमाचरणजी त्यांना म्हाणाले, "पाऊस थांबत नाही, सर्वत्र अंधार आणि बाबांनी घरी जायची आज्ञा केली आहे. आता तुम्हीच सांगा कसा जाऊ?"

मंगलदास म्हणाले, "बंगाली बाबू, घाबरू नका. बाबांचे नाव घ्या व निघा. काहीतरी कारण असल्याशिवाय स्वामीजी अशी आज्ञा देणार नाहीत."

उमाचरणजींना थोडा धीर आला. परत जाऊन त्यांनी स्वामीजींना नमस्कार केला व ते घरी जाण्यास निघाले. रस्त्यावर गुडघाभर पाणी साचले होते. अंधारात काही दिसत नव्हते. पावसाच्या जोराने कान बसल्यासारखे झाले होते, तरीही उमाचरणजींना एक विचित्र अनुभव आला. पावसाचा एकही थेंब त्यांच्या अंगावर पडत नव्हता. जणुकाही त्यांच्या डोक्यावर कोणी भलीमोठी छत्री धरली होती. थोडे अंतर जाताच, एका गल्लीतून अचानक एक माणूस आला. त्याच्या हातात कंदील होता. त्याच्या उजेडात त्याच्या मागून चालताना उमाचरणजी निर्भय झाले.

त्या माणसाबरोबर चालावे म्हणून उमाचरणजींनी त्याला आवाज दिला परंतु त्याने ऐकले नाही. त्यांना वाटले पावसाच्या आवाजात त्याला ऐकू गेले नसावे म्हणून ते त्याला गाठण्याच्या हेतूने भरभर चालू लागले. उमाचरणजींनी चालण्याचा वेग वाढवताच त्या व्यक्तीने पण त्याची गती वाढवली. परीणामस्वरूप त्यांच्यातील अंतर कायम राहीले.

शेवटी उमाचरणजी सावकाश चालू लागले. आश्चर्य म्हणजे त्यांच्या समोर कंदिल घेऊन चालणारा माणूस त्यांच्या घराच्याच दिशेने जात होता. घर येताच तो माणूस अचानक नाहीसा झाला. त्यांना लागलीच कळले की ही स्वामीजींचीच किमया आहे. या कारणाकरताच त्यांनी अशा भयावह वातावरणात घरी जाण्यास सांगितले.

क्रमश:



# भक्तांची काळजी देवाला

“तुम्ही ईश्वराकडे चार पावले जाण्याचा प्रयत्न केला तर पुढची दहा पावले टाकण्याची शक्ती तो तुम्हाला देतो.”

हे वाक्य बाबाजींसारख्या थोर महात्म्यांनी सांगितले आहे. लेखक वि.के. फडके यांचे ‘मंत्र, स्तोत्रे आणि उपासना’ हे पुस्तक वाचनात आले. त्यांना बाबाजींसारख्या थोर व्यक्तीचा सहवास मिळाला आणि त्यांच्या तोंडून निघालेले संवाद, प्रसंग आपल्या समोर मांडले आहेत. ‘भक्ताची काळजी देवाला’ हा एक मुद्दा बाबाजींनी आपल्याला समजावून सांगितला आहे.

सुरुवातीलाच त्यांनी आपल्या सारख्या साधकांच्या झोपेवर घाला घातला आहे. ते म्हणतात साधकाने कधीही साखर झोप घ्यायची नसते. ही साखर झोप साधकांची परीक्षा घेण्यासाठी मुद्दाम ठेवली आहे. परंतु हीच खरी साधनेची वेळ आहे. ज्याने ही वेळ साधली त्याने सर्व साधले. पुढे ते असेही म्हणतात, ज्याला साधना मार्गात खरोखरच काही प्रगती करायची असेल तर पहाटे तीन साडेतीन पर्यंत उठलेच पाहिजे. तीन ते सहा हे तीन तास ध्यान धारणा जप यासाठीच राखून ठेवले पाहिजेत. याचे कारण असे की या काळात देवदेवता पृथ्वीवर अदृश्य स्वरूपात अवतरतात आणि त्यांचा आशिर्वाद साधकाला ह्या काळात मिळू शकतो.

आता सुरुवातीला हे सर्व करणे कठीण आहे. पण ‘मनोनिग्रह’ ही साधना मार्गातील अतिशय महत्वाची गोष्ट आहे. मनोनिग्रह म्हटले की त्यात पहिल्यांदी मन हे आलेच. म्हणून मनाला जिंकण्यासाठी अगोदर जिभेला जिंकले पाहिजे असे त्यांचे सांगणे आहे. तामसी पदार्थ आहारातून वर्ज्य करून शुध्द सात्विक आहार घ्यावा की ज्यामुळे तुमचे मन हळूहळू शुध्द, सात्विक होईल.

एकदा मन आपल्या ताब्यात आले की मग मनाला शिस्त लावण सोप्प जात. लोखंडी सळई तापल्यावर जशी हवी तशी वाकवता येते तसेच आपल शुध्द, सात्विक मन दांडगाई करत नाही. साधकाने एकदा मनावर विजय मिळवला की त्याने अर्धी लढाई जिंकलीच म्हणून समजा.


ही लढाई जिंकण्यासाठी खुप प्रयत्न करावे लागतात. अडथळ्यांची शर्यतच म्हणावी लागेल. पण आपण मनापासून देवाची प्रार्थना केली तर देवही आपल्याला सहाय्य केल्याशिवाय रहात नाही. पहाटे उठण्यासाठी देवालाच शरण जावे व त्यालाच विनंती करावी की मला उपासना करण्यासाठी लवकर उठण्याची शक्ती दे आणि मग बघा काय घडते ते.

देवावर आपण प्रीती केली, माया केली तर तो ही आपल्यावर प्रेम करेल, माया करेल आपली काळजी करेल. आता हे प्रेम संपादन करण्यासाठीही बाबाजी आपल्याला मार्ग सांगतात. सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे नामस्मरण करणे. हे नामस्मरण कुठेही, केव्हाही करता येते. कोणतीही शंका न घेता हे नामस्मरण सुरु करा. सुरुवातीला काही अनुभव आला नाही तरी ते सोडू नका. एकदा नाम मुखात बसलं की ते नामच तुमचा गुरु बनून तुम्हाला सतत मार्गदर्शन करील.

पूज्य बाबाजींचे म्हणणे अगदी शब्द न शब्द खरे आहे. मनोनिग्रह आणि नामस्मरण या दोन्ही गोष्टी आपल्याला साधता आल्या तर आपण आपल्यात अनेक बदल घडवून आणू शकतो. मला वाटतं नामस्मरणातच मनोनिग्रह लपलेला आहे. कारण नामच मनाला स्थिर करत आणि अनेक आकर्षणापासून दूर ठेवत. मनाचे चोचल्यांकडे दुर्लक्ष करायचे असेल तर नामच उपयोगी पडेल नाही का? असं म्हणतात की कलियुगात आपण होम, हवन, मोठमोठ्या पूजाअर्चा करू शकत नाही तर मग अनेक संतांनी नामस्मरणाचा मार्ग सांगून सुखी समाधानी आयुष्याचा गुरुमंत्रच दिला आहे.

आपण सर्व रेकि साधक आहोत तर आपणही स्वामी समर्थांचे नामस्मरण करतो. मग रेकि घेतानाही स्वामी समर्थांचे नाम सतत घेतले तर?

**सविता कर्णिक, ठाणे**




# हरवलेल्या बकऱ्याची कथा

ही कथा तशी पाहता परदेशातील एका सुखवस्तु गावातील. परंतु सगळ्याच जगातील समाजांना लागू पडणारी आणि म्हणूनच बोधप्रद.

अमेरिकेतील एका गावात एक शाळा होती. रविवारचा दिवस होता. दुपारची वेळ. शनिवार रविवार म्हटले कि अमेरिकेसारख्या देशामध्ये आळसाचे दिवस. तशीच ही सुस्तावलेली दुपार. परंतु गावातील त्या शाळेत जाणारी काही वात्रट मुले मात्र कामाला लागलेली. त्यांनी काय केले कि कोठल्यातरी शेतावरल्या तीन बकऱ्या पळवून घेऊन आले. आणि त्या बकऱ्यांना घेऊन ते शाळेच्या आवारात आले. शाळेचे मुख्य द्वार तसे बंदच असते कारण शाळेला सुट्टी ह्या दोन दिवसात. त्यामुळे आजूबाजूला सुद्धा कोणच नव्हते. त्या मुलांनी त्या बकऱ्यांच्या पाठीवर रंगाने आकडे रंगवले. पहिल्याच्या पाठीवर १, दुसऱ्याच्या २ आणि तिसऱ्याच्या ४. त्या मुलांनी शाळेच्या मागच्या बाजूच्या दरवाजाच्या वरून ह्या तिनही बकऱ्यांना शाळेच्या आवारात सोडून दिले. आणि काही झालेच नाही अशा रितीने ती वात्रट मुले आपापल्या घरी निघून गेली.

सोमवारचा दिवस सुरू झाला आणि लगबग सुरू झाली. शाळा सुरू व्हायची सकाळी ८ वाजता. साधारण साडे सात वाजता शाळेचा कर्मचारीवर्ग शाळेत येऊ लागला. आल्या आल्या त्यांच्या नाकामध्ये एक आगळा वेगळा दर्प आला. चौकशी करता पत्ता लागला कि शाळेच्या संपूर्ण आवारामध्ये बकऱ्यांची विष्ठा पसरली होती. कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले कि काहीतरी गडबड आहे. काही बकऱ्या शाळेच्या आवारात घुसलेल्या आहेत. झाले, आता सगळ्यांचेच लक्ष त्या बकऱ्यांना शोधण्यात लागले. प्रत्येक कर्मचारी बकऱ्यांचा शोध घेत आहे. अशा वातावरणात शाळा कशी भरवणार? मग प्राचार्यांनी ठरवले कि आता सकाळच्या शाळेला सुट्टी देणे क्रमप्राप्त आहे. बकऱ्या शोधायच्या, त्यांना हाकलवायचे, शाळा साफ करायची म्हणजे वेळ तर लागणारच.

एवढ्या गडबडीत पहिली बकरी शाळेच्या तळमजल्याच्या वर्गातच मिळाली. तिच्या पाठीवरचा क्रमांक १ होता. आणखी किती बकऱ्या आहेत याचा अंदाज तसा कोणालाच नव्हता.तेवढ्यात कोणीतरी शिपाईवर्गातील एक कर्मचारी चार क्रमांक लिहिलेल्या बकरीला दुसऱ्या इमारतीतून घेऊन आला. झाले सगळ्यांच्या लक्षात आले कि कमीत कमी चार बकऱ्या तर असाव्यात. आणखी काही वेळ घाम गाळल्यानंतर दुसऱ्या क्रमांकाची बकरी मिळाली. चला, आता तीन क्रमांकाच्या बकरीचा शोध घेऊ या. कोणीतरी कपाळावरचा घाम टिपत एका शिक्षकाला म्हणाला.

आता सगळ्यांच्या हेही लक्षात आले कि जास्त बकऱ्या नाही आहेत. कारण खूप असत्या तर दिसल्या असत्या एव्हापर्यंत. आता एकच बकरी शोधायची. सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. परंतु तिसरी बकरी काही मिळत नव्हती. दुपारची वेळही टळून गेली. दुपारचे वर्गही रद्द केले गेले. प्राचार्यांना घाम फुटत होता. सगळ्या गावात बात पसरली होती कि शाळेत चार बकऱ्या शिरल्या आहेत. परंतु त्यातील तीनच मिळाल्या. चौथी काही केल्या मिळत नाही. अगदी संध्याकाळ आणि त्यानंतर रात्रीही हा बकऱ्या शोधण्याचा खेळ चालूच राहीला कारण सकाळी शाळा भरवायची तर बकरी सापडायला पाहीजे. साफ सफाई व्हायला पाहीजे. सगळे कर्मचारी कसे थकून गेले. बरे शाळेचा विस्तारही तसा मोठा. शेवटी एका शिक्षकाच्या डोक्यात प्रकाश पडला. म्हणाला, “अरे, आपण काय शोधतोय? कदाचित चार बकऱ्या नव्हत्याच. कोणीतरी आपली फजिती करायला तीन बकऱ्यांवर हे असे क्रमांक टाकले आहेत. आपण उगीचच जे नाहीच आहे ते शोधतोय. कसे मिळणार. आपले तर्कबद्ध मन असे धरून चालले आहे कि १ आणि २ आले कि ३ असायलाच पाहीजे. त्याशिवाय चार येणारच नाही, पण आयुष्य म्हणजे तर्कशास्त्र नाही.” आणि मग सगळेच खो–खो हसू लागले. आपली कशी फजिती झाली हे त्यांच्या लक्षात आले. आत असलेल्या तीनही बकऱ्या सकाळीच मिळून सुद्धा ‘त्या’ नसलेल्या बकरीच्या मागे आपण केवढा वेळ आणि श्रम व्यर्थ केले?

आयुष्यातही आपण बऱ्याच वेळा हेच करत नाही का? आपल्याच तर्कांचे आपण बळी होतो आणि नसत्याच्या शोधात राहून आयुष्याचा किंवा आयुष्यात असलेल्याचा आनंद हरवून बसतो. सगळ्याच गोष्टी तर्काच्या चाकावर घासून पहायची गरज नसते.



जाहल्या स्वामीराज वैद्य, व्याधी पळे आपणची...

# भीमरावाचे आवाळू गेले..

भीमराव हा स्वामींच्या सेवेतील एक सेवेकरी होता, त्याच्या डोक्यावर एक तांब्याएवढे मोठे आवाळू होते. त्याची मुद्रा चमत्कारीक दिसे. त्याने श्री स्वामी समर्थांची मनोभावे सेवा केली. नित्य भीमराव आणि त्याचा मुलगा बागेत जाऊन टोपलीभर फुले समर्थांसाठी आणीत असे. त्याला बाकीचे सेवेकरी थट्टेने दोन डोक्यांचा माणुस म्हणुन हाक मारीत. एक दिवस महाराज आनंदात बसले असता, भीमरावांनी फुलाची टोपली भरून आणली. त्याला दूरून येताना पाहताच सेवेकरी दोन डोक्यांचा माणुस आला अशी थट्टा करू लागले व हसू लागले.. त्याच बरोबर महाराजही दोन डोक्यांचा माणुस म्हणून खदखदा हसू लागले. भीमराव फार खिन्न झाला. पण ही संधी बरी आहे असे पाहून तो श्रींस म्हणाला, “लोक हसतात ते हसोत. पण आपण दीनदयाळ, भक्तवत्सल असून आपल्या भक्ताचे व्यंग पाहून ते व्यंग दूर करणे आपल्या भक्तवात्सल्याचा धर्म आहे. तर ह्या दीनावर कृपा करून ह्या व्यंगापासून मुक्त करावे.मग लोक का हसतील?” अशी श्रींची त्याने प्रार्थना केली.

कृपाळू महाराजांना त्याची कींव आली. पण त्यावेळेस त्यास काहीच बोलले नाहीत. रात्री भीमराव निद्रिस्त असता स्वप्नात दर्शन देऊन त्याचे डोक्यावरील आवाळूवरून हात फिरविला. सकाळी भीमराव जागा होऊन पाहतो तो डोकीचे आवाळू फुटुन त्याचे वीतभर कातडे लोंबू लागले. परमानंदाने भीमराव महाराजांचे दर्शनास गेला. दोन डोक्यांचा माणुस एक डोक्याचा झाला असे सर्व लोक म्हणू लागले. भीमरावाने महाराजांनी स्वप्नात दर्शन दिल्याची गोष्ट सर्वांना सांगितली. पुढे भीमरावाला चिंता पडली कि कातडे कापून टाकू कि कसे करू? त्यास महाराजांनी तीर्थ अंगारा लावण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणे केल्यावर काही दिवसांनी कातडे आपले आपण सुकुन नाहीसे झाले.

(संदर्भ : अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ यांचे चरित्र व आठवणी– प्रकाशक श्री व.न झुरळे– पृष्ठ २८)

# राणी मदालसा



**मृणाल कुटुंबळे, वडोदरा.**

आपल्या संस्कृतीत आईचे स्थान सर्वोच्च आहे. महाभारतात जेव्हा यक्ष धर्मराज युधिष्ठिराला विचारतात की भूमीपेक्षा श्रेष्ठ कोण? तेव्हा युधिष्ठिर म्हणतात "माता गुरुतरा भूमे"

परमेश्वराच्या सान्निध्यात राहण्याचे भाग्य आईला मिळाले आहे. परमेश्वराला आनंद झाला आणि त्याने आईला विचारले, "सांग, तुला काय हवे आहे?" तिच्या एका डोळ्यात आनंद आणि दुसऱ्या डोळ्यात अश्रू येऊन ती म्हणाली, "माझ्या बाळाचे भाग्य मी लिहु शकेन असे वरदान द्या." देवाने 'तथास्तु' म्हटले आणि तिच्या बाळाचे भाग्य घडवण्यासाठी तिला नऊ महिने दिले. ईश्वराने ज्याप्रमाणे सृष्टी निर्माण केली त्याप्रमाणेच ती स्वत:च्या बाळाचे निर्माण करते. ती जेव्हा गर्भवती होते तेव्हा गर्भात असलेल्या बाळाला चांगले संस्कार देऊन भविष्याचा एक आदर्श नागरिक बनवणे, हे आईच्या हातात असते. गर्भस्थ बाळावर उत्तम संस्कारांचे सिंचन करुन एक तेजस्वी, सद्गुणी बाळाची प्राप्ती आई करुन घेऊ शकते. ह्याची अनेक उदाहरणे आहेत त्यातीलच एका विदुषीचे उदाहरण आज इथे पहाणार आहोत.

राणी मदालसा,  मद: अलस: यया सा मदालसा" म्हणजेच ज्यामुळे मद नाहीसा होतो ती मदालसा. मार्कंण्डेय पुराणानुसार गंधर्व विश्वावसुची मुलगी मदालसा. ती राजा ऋतुध्वजाची पत्नी होती. एकदा राक्षसांशी युद्ध करताना ऋतुध्वजाची सेना राक्षसांवर आक्रमण करत होती. त्यांच्यावर वर्चस्व मिळवत होती. तेव्हा राजाच्या सेनेचे मनोबळ तोडण्यासाठी त्या मायावी राक्षसांनी एक अफ़वा उठवली की ऋतुध्वज राजाचा मृत्यु झाला आहे. ही गोष्ट त्याची राणी मदालसेच्या कानी आली. हे दु:ख सहन न होऊन तिने प्राणत्याग केला. तिकडे राक्षसांवर विजय मिळवून राजा ऋतुध्वज महालात आला तेव्हा त्याला कळले की राणीने प्राणत्याग केला आहे. राणीचा विरह सहन न झाल्याने राजा विक्षिप्तासारखा राज्यात भटकू लागला. ऋतुध्वजाचा एक खास मित्र होता, नागराज. त्याला राजाची ही अवस्था पाहवेना. तो खुप दु:खी झाला आणि महादेवांना प्रसन्न करण्यासाठी हिमालयात निघुन गेला. महादेव प्रसन्न झाले आणि त्यांनी वरदान मागायला सांगितले. नागराजांनी स्वत:साठी काहीही न मागता, स्वत:चा मित्र राजा ऋतुध्वजासाठी राणी मदालसेला जिवंत करण्याचा वर मागितला. महादेवांच्या आशिर्वादाने राणी मदालसा तेच वय घेऊन जिवंत झाली. ऋतुध्वजाला अतोनात आनंद झाला. मृत्युनंतर मिळालेल्या पुनर्जन्मामुळे मदालसेला मानवी देहाची नश्वरता, आणि जीवनाचे सार ह्याचा बोध झाला. तिच्या मनातला अंधकार नाहीसा होऊन तिला आत्मज्ञानाची प्राप्ति झाली. काही काळानंतर मदालसा गर्भवती झाली. तिने निश्चय केला की, माझ्या गर्भात वाढणाऱ्या जीवाचा पुनर्जन्म होणार नाही. देहाच्या नश्वरतेचे आणि क्षणभंगुर आयुष्याचे हे ज्ञान ती तिच्या गर्भात असलेल्या बाळाला अंगाईगीत गाऊन देऊ लागली.

इथे आपल्याला गर्भ संस्काराचे महत्व लक्षात येते. प्राचीन काळापासून भारतिय संस्कृतीत सोळा संस्कारांचा उल्लेख आहे. त्यातला हा एक प्रमुख संस्कार आहे. चिकित्सा विज्ञानाने पण आता हे मान्य केले आहे. गर्भात असलेला शिशु सुध्दा आईच्या द्वारे ज्ञानप्राप्ति करु शकतो, ह्याची अनेक

उदाहरणे आहेत. महाभारत काळात अर्जुन आणि सुभद्रेचा मुलगा अभिमन्युला चक्रव्युहाचे शिक्षण गर्भातच मिळाले. जैन धर्मात आचार्य भद्रबाहु स्वामींनी भगवान महावीरांच्या गर्भस्थ जीवनाचा उल्लेख केला आहे. कयाधु नारदमुनिंच्या आश्रमात असताना तिथे अखंड चालणाऱ्या 'नारायण नारायण' ह्या नामाचा संस्कार प्रल्हादावर झाला आणि तो विष्णूभक्त झाला. जनक राजाचे गुरु अष्टावक्र हे सुध्दा गर्भात असल्यापासूनच ज्ञानी होते हेही आपण जाणतो.

राणी मदालसाला पुढे तीन मुले झाली. राजा क्षत्रिय असल्याने त्याला त्याच्या राजपुत्राचे नाव क्षत्रियाला अनुरुप असे ठेवायचे होते. त्यांनी विक्रांत, सुबाहु आणि शत्रूमर्दन अशी नावे ठेवली. त्या सगळ्यांना मदालसाने संस्कार दिले होते. पाळण्यात अंगाईगीत गाऊन झोपवताना राजपुत्र रडायचे तेव्हा ती म्हणायची,

**शुद्धोऽसि रे तात न तेऽस्ति नाम कृतं हि ते कल्पनयाधुनैव।**
**पंचात्मकम देहमिदं न तेऽस्ति नैवास्य त्वं रोदिषि कस्य हेतो:॥**

"तुझ्या शरीराने जन्म घेतला आहे तसेच एक दिवस ते नष्ट होईल. जसे जुने कपडे फाटले की त्याचा त्याग करतात. तसाच शरीराचा पण त्याग एक दिवस करायचा आहे. शरीराचा नाश होण्याने तुझे काहीच नष्ट होत नाही. तू तर एक आनंदमयी आत्मा आहेस. मग का रडतोयस?"

गर्भात असतानाच निवृत्तीच्या ज्ञानमार्गाचे बाळकडू मिळाल्याने थोडे मोठे झाल्यावर त्या सर्वांनी संसाराचा त्याग केला. निवृत्तीमार्गाचे साधक झाले. सर्वांनी संन्यास घेतला. राजा दु:खी झाला. चिंतामग्न झाला.

मदालसा परत गर्भवती झाली. तेव्हा राजाने तिची विनवणी केली की आपले सगळे राजपुत्र संन्यासी झाले, तर राज्याला वारस कसा मिळणार? ह्या राज्याचे काय होणार? म्हणून ह्या राजपुत्राला तू राजधर्माचे शिक्षण दे. तिने राजाच्या इच्छेप्रमाणे चौथ्या राजपुत्राचे नाव 'अलर्क' ठेवले. त्याला तिने राजधर्म, आणि क्षत्रियधर्माचे शिक्षण दिले. अलर्कवर त्याच्या दिव्य विदुषी मातेचे संस्कार होते. तो सर्वगुणसंपन्न होता. त्याला राजधर्माच्या शिक्षणाबरोबर न्याय, करुणा, दान ह्याचे पण शिक्षण आईने दिले होते. एकदा एक अंध ब्राह्मण राजा अलर्काच्या भेटीस आला. अलर्काला त्या ब्राह्मणाबद्दल करुणा उत्पन्न होऊन त्याने त्याचे दोन्ही डोळे दान केले. क्षत्रिय कुळात जन्म घेतलेला मुलगा ब्रह्मज्ञानी न होता कुळाच्या आचाराप्रमाणे शूर, असेल ह्या मान्यतेला मदालसाने छेद दिला. स्वत:च्या बाळाचे संगोपन कसे करायचे हे सर्वस्वी आईच्या हातात असते. त्याला शूर, शत्रुंजय बनवायचे की धीरगंभीर, महात्मा, ब्रह्मज्ञानी हे आईच करू शकते. स्वत:च्या मुलाला साधक आणि शासक दोन्हीचे शिक्षण एकाचवेळी देणे हे कार्य फक्त एक दिव्यस्वरुप आईचे संस्कार करु शकतात.

अलर्क चा अर्थ मदोन्मत्त व्यक्ती. राज्यकारभार हाती येताच अधिकार मिळाल्यावर हा मदोन्मत्त होऊ शकतो, प्रजेकडून कराच्या रुपात मिळणारे उत्पन्न किंवा संपत्तीचा भोगी होऊ शकतो, ह्या शक्यतेमुळे मदालसाने अलर्कला कर्मयोग, भक्तियोग आणि राजयोगाचा उपदेश केला. तिने त्याच्या अंगठीमध्ये एका कागदावर उपदेश लिहून अलर्कला देत म्हणाली, "तू जेव्हा अडचणीत येशील, तुझ्यावर जेव्हा संकट येईल तेव्हा हा उपदेश तू वाच." अलर्क राजा झाल्यावर अधिकाराच्या उन्मादात तो भोगी झाला. आसक्त झाला. आईने दिलेला उपदेश विसरुन गेला. इथे एक गोष्ट ध्यानात येते जी आई मुलाला ९ महिने गर्भात वाढवते ती स्वत:च्या बाळाला नखशिखांत ओळखत असते. आपले मुल पुढे कुठे अडकू शकते, संकटांचा सामना करायला ते सशक्त आहे किंवा नाही हे तिला पक्के ठाऊक असते. त्या संकटाला झुंज देण्यासाठी ती मार्ग सुद्धा दाखवते. असो.. आईचा उपदेश विसरुन तो भोगविलासात लोळू लागला. त्याचे तिघे भाऊ त्याच्या राज्यात आले. अलर्कने त्यांना नमस्कार केला तेव्हा ते म्हणाले, "आईचा उपदेश आठव. मुलाला राज्य देऊन आमच्याबरोबर वनात चल." तो हसायला लागला आणि म्हणाला, "तुम्ही तर संन्यासी आहातच. तुमच्याबरोबर मला का संन्यासी करताय? या राज्यातून निघून जा." हे उद्गार ऐकुन ते तिघेही भाऊ दु:खी झाले आणि काशीराज मामाच्या घरी गेले. काशीराज सैन्य घेऊन आले आणि अलर्कच्या राज्याला वेढा घातला. अलर्कने किल्ल्यावर चढून पाहिले तर समोर अवाढव्य सैन्य पाहून तो उदास झाला. तेव्हा त्याला आईने उपदेश लिहून अंगठीत ठेवायला दिला होता ती गोष्ट आठवली. त्याने तो कागद उघडून वाचला. त्यात लिहिले होते,

**शुध्दोसि बुध्दोसि निरंजनोऽसि, संसारमाया परिवर्जितोऽसि**
**संसारस्वप्नं त्यज मोहनिद्रामदालसोल्लपमुवाच पुत्रम् ॥**

"हे मुला, तू शुध्द आहेस, तू बुध्द आहेस, तू निरंजन आहेस. संसाररुपी मोहापासून निर्लिप्त आहेस. ह्या मोहमायेतून बाहेर ये."

अलर्काने या श्लोकावर विचार केला, त्याला बोध झाला. प्रवृत्तीचा मार्ग सोडून निवृत्तीकडे मार्गस्थ झाला. अलर्कने त्याच्या मुलाला राज्यकारभार सोपवून दिला. अहं शुध्दोसि, अहं बुध्दोसि असे म्हणत म्हणत वनाकडे निघाला. तिथे त्याला दत्तगुरु भेटले. गुरुदेवांनी अलर्काला उपदेश देऊन शांत केले. त्याला आत्मज्ञान झाले.

प्रत्येक कुटुंबाचे, समाजाचे, राष्ट्राचे भवितव्य आणि एका उत्तम व्यक्तिमत्वाचे निर्माण एक मातेच्या गर्भापासून होते. मातेचे कर्तव्य आहे की एका उत्तम आदर्श बाळाला जन्म देऊन त्याला संस्कारीत करून समाजाला अर्पण करणे. ही एका आईची जवाबदारी पण आहे. आतंकवाद्यांचे निर्माण का होते? तर त्यांना बाळपणापासून आईचे प्रेम, वात्सल्य मिळालेले नसते. त्याला चांगले संस्कार मिळत नाहीत. त्याच्या बुध्दीला दिशा देणारा गुरुवर्ग मिळत नाही. बुध्दीला दिशा मिळाली तर प्रगती होते, नाहीतर अधोगती होते असे गुरुजी नेहमी म्हणतात. आज सारे विश्व भौतिकतेच्या मर्यादा ओलांडून अधोगतीला लागले आहे. आज नैतिकता, मानवता, बंधुभाव ह्या मानवी मुल्यांची समाजाला आवश्यकता आहे. आज राणी मदलसा सारख्या दिव्य मातांचे निर्माण होणे ही समाजाची, राष्ट्राची गरज आहे. भारताची भूमी अशा अनेक मातांच्या गाथेने पावन झाली आहे. ज्यामुळे ही भारताची भूमी आणि महान हिंदू धर्म चिरंजीवी आहे.





# जोगवा

रंगाची उधळण दे
ओठी नवे गीत दे
स्वप्नातील कळ्यांना
उमलण्याचे भाग्य दे ॥

मांगल्याची आस दे
ध्येयाचा ध्यास दे
प्रयत्नांच्या वेलीवर यशाचे
फुल दे ॥

मुक्त मोकळा श्वास दे
जगण्याचे भान दे
श्रध्देच्या जोडीला संयमाची
साथ दे ॥

मायेची उब दे
ह्दयाची हाक दे
मुक्तीच्या मार्गात
आत्मदिपाचा प्रकाश दे ॥

---

मीना भावे, वडोदरा.

# स्वामी विवेकानंद आणि ध्यान

**लेखांक ९वा**

**अनुवादक : श्री प्रांजल जोशी, पुणे**




## भगवान बुध्दांबद्दलची एक आख्यायिका

असे म्हणतात की भगवान बुध्द इतके शुध्द होते, की कोणी त्यांचा चेहरा लांबून जरी पाहिला, तरी त्यांच्या सात्विकतेमुळे लगेचच त्यांना पाहणारा माणूस औपचारिक पूजा अर्चा (कर्म कांड इ.) यज्ञ, धर्म सोडून संन्यासी बनत असे. त्यामुळे मग साहजिकच देव-देवतांना आहुती देणे, नैवेद्य दाखविणे, त्यांची अंगपूजा करणे, भोग चढवणे इ. गोष्टी आपोआपच कमी झाल्या.

मग काय, या प्रश्नावर देवांची बैठक बोलावण्यात आली. देव म्हणाले, आमचे सगळे महात्म्य संपुष्टात आले आहे. कारण बहुतेक देव-देवता या समारंभावर, पूजा अर्चांवर जगतात, हे असे यज्ञ, पूजा नैवद्य दाखविणे अन भोग चढवणे या गोष्टी देवतांकडे जात नाहीत कारण सर्व यज्ञच संपत चालले आहेत, त्यामुळे देवता उपासमारीने मरत आहेत आणि त्यांच्या शक्तीचे पतन होते आहे.

मग देवतांनी एकमताने ठरविले की काहीही करून या माणसाला थांबविले पाहिजे. त्याचे पावित्र्य अन शुध्दता आता सहन होत नाही. तीच आपल्या जीवावर बेतली आहे.

असे ठरवून मग काही देवता बुध्दांना येऊन म्हणाल्या, "महाराज, आम्ही तुमच्याकडून काही मागण्यासाठी आलेलो आहोत. आम्हाला मोठ्या आहुत्या द्यायच्या आहेत, अन त्यासाठी एक विशाल यज्ञ करावयाचा आहे. आम्ही संपूर्ण जगामध्ये असे पवित्र ठिकाण शोधत आहोत, पण आम्हाला हवी तशी पवित्र अन शुध्द जागाच मिळत नव्हती."

"पण आता तशी पवित्र जागा आम्हाला सापडली आहे. जर तुम्ही आडवे झोपी गेलात, तर तुमच्या छातीवर आम्ही तो प्रचंड अग्नी प्रज्वलित करून मोठा यज्ञ करू इच्छितो."

भगवान बुध्दांनी, देवांच्या या प्रस्तावास तात्काळ होकार दिला.

मग काय, देवतांनी भगवान बुध्दांच्या छातीवर प्रचंड अग्नी प्रज्वलित केला. त्यांना वाटले की आता काही बुध्द या अग्नीतून वाचत नाही, तो मेला असेल, पण तसे काहीच झाले नाही. देव येथे देखील थांबले नाहीत, पुढे जाऊन सर्व देवांनी भगवान बुध्दांना मारायला सुरुवात केली. पण काहीही झाले तरी देव त्यांना ठार मारू शकले नाहीत.

तेवढयात खालून एक आवाज ऐकू आला, "तुम्ही सर्वजण हे व्यर्थ प्रयत्न का करीत आहात?"

"जो तुमच्याकडे पहातो तो शुध्द होतो व संन्यस्त होऊन सदगतीस जातो, अशाने मग कोणीच आमची पूजा करणार नाही." देव म्हणाले.

"तर मग तुमचा हा प्रयत्न नक्कीच विफल आहे, कारण पावित्र्याला कधीच कोणी ठार करू शकत नाही, पावित्र्य कधीच संपू शकत नाही." बुध्द म्हणाले.



## “समाधी” चे गाणे !

**(मूळ बंगाली भाषेतून भाषांतरित)**

सूर्यही नाही, देखणा चंद्रही नाही
शून्याच्या पोकळीत, प्रकाशही लुप्त
तरंगणाऱ्या सावल्यांचे
आभासी विश्व फक्त !

मनाच्या निरर्थक शून्यात,
क्षणभंगुर विश्वाचा उदय अन अस्त !
निवले बाह्य तरंग
माझ्याच निरंतन अस्तित्वात स्वस्थ !

हळू हळू सावल्यांचा थवा,
प्रवेशी आदिम गर्भगृहात
अहं ब्रम्हास्मि ची जाण
आज निरंतन ह्रदयात !

सर्वकाही थांबले, अन “जाणं” ही थांबली,
शून्यात मनाच्या पलीकडे काहीच न उरे,

हे समजते ह्रदय ज्याचे,
तोच स्वरूप जाणे खरे !

# स्वामीजींशी प्रश्नोत्तरे

**प्रश्न : आपण कोणाला गुरु म्हणू शकतो?**

**स्वामी विवेकानंद :** जो आपला भूतकाळ आणि भविष्यकाळ सांगू शकेल तो तुमचा गुरु आहे.

**प्रश्न : एकनिष्ठ भक्ती कशी करता येते?**

**स्वामी विवेकानंद :** तुमच्यात मुळातच एकनिष्ठ भक्ती आहे. केवळ वासनेचा अन मोहाचा बुरखा तिला व्यापून टाकते. ज्याक्षणी तो बुरखा दूर होईल, एकनिष्ठ भक्ती स्वत:च प्रकट होईल.

**प्रश्न : कुंडलिनी (आध्यात्मिक ऊर्जा) खरोखरच भौतिक शरीरात अस्तित्वात आहे का?**

**स्वामी विवेकानंद :** श्री रामकृष्ण म्हणायचे की तशी ती अस्तित्वात नसते, परंतु योग सामर्थ्याने ती तयार केली जाते.

**प्रश्न : एखादी व्यक्ती मूर्ती पूजनाद्वारे मुक्ति मिळवू शकते का?**

**स्वामी विवेकानंद :** प्रतिमा (मूर्ती) – उपासना थेट मुक्ती देऊ शकत नाहीत; ते एक अप्रत्यक्ष कारण असू शकते, काही काळ अध्यात्मिक वाटेत ते चांगली मदत करते एवढेच. पण म्हणून मूर्ती – पूजनाचा निषेध करता कामा नये, कारण अद्वैताची प्राप्तीच माणसाला परिपूर्ण बनवते.

**प्रश्न : मुक्ति म्हणजे काय?**

**स्वामी विवेकानंद :** मुक्ति म्हणजे संपूर्ण स्वातंत्र्य. चांगल्या आणि वाईट या दोनही वृत्तींच्या गुलामगिरीतून मुक्तता. सोन्याची देखील साखळीच जितकी लोखंडाची साखळी, म्हणून श्री रामकृष्ण एक उदाहरण द्यायचे ट्ट समजा एक काटा पायात रुतला असेल तर तो काढण्यासाठी आपण दुसरा काटा वापरतो. पण एकदा का पायात रुतलेला काटा काढला की मग दोन्ही काटे लांब टाकून दिले जातात. तसेच वाईट प्रवृत्तींचा प्रतिकार करण्यासाठी चांगल्या गोष्टी (चांगल्या वृत्तींचा) वापर करावा. परंतु त्या नंतर, चांगल्या प्रवृत्ती देखील काबीज करणे आवश्यक आहे.

(क्रमश:)



# अष्टावक्र गीता

(भाग ३)

**अजित सर**

## अध्याय पहिला – (सूत्र १)

### जनक उवाच

कथं ज्ञानमवाप्नोति कथं मुक्तिर्भविष्यति ।
वैराग्यं च कथं प्राप्तमेतद् ब्रूहि मम प्रभो ॥

**अर्थ:** ज्ञान आणि मुक्ती प्राप्त करण्यासाठी राजा जनकाने अष्टावक्रांसमोर प्रश्न केला कि हे प्रभो, ज्ञान प्राप्त कसे होते? मुक्ती कशी मिळते? आणि वैराग्य प्राप्त होण्यासाठी काय करावे? हे मला समजावून सांगा

अध्यात्मामध्ये ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. आत्मज्ञान आंतरिक आहे. बाकीचे सगळे जे ज्ञान सामान्यत: म्हटले जाते ते म्हणजे केवळ माहितीचा संग्रह आहे. ते बाहेरून आणावे लागते. आपण अनुभवत असलेली सृष्टी म्हणजे केवळ मूळ चैतन्याचे जड स्वरूप आहे. आत्म्याचे ज्ञान हीच परमात्म्याची ओळख आहे. दोन्ही एकाच तत्वाचे आहेत. हा आत्मा तोच ब्रह्म. हे एकदा जाणले कि काहीच जाणायची गरज भासत नाही. हे जाणले कि सगळेच ज्ञात होते. उपनिषदात जसे म्हटले आहे, यस्मिन् विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवति। (ज्याच्या जाणण्याने सगळे काही जाणले जाते). सगळ्या सृष्टीचे ज्ञान प्राप्त होते. मग नाही जाणले असे काहीच राहत नाही. मनुष्य म्हणजे केवळ देह, मन, बुद्धी, अहंकार इत्यादि नाही. आत्मा हेच त्याचे मूळ स्वरूप आहे. तेच त्याचे स्वरूप निरंतर आहे, नित्य आहे, शाश्वत आहे. ह्या आत्म्याचे ज्ञान म्हणजेच स्व चे ज्ञान. अज्ञानी हे तत्व जाणत नाहीत तर ज्ञानी माणसांना हे ज्ञान प्राप्त झाले आहे. जे सूक्ष्म आहे, अगोचर आहे, इंद्रियातीत आहे.

आपण मूळातच पूर्ण आहोत कारण आपण त्या परमेश्वराचा दिव्य अंश आहोत. दुर्दैवाने आपल्या अज्ञानामुळे ह्या पूर्णत्वाचा अनुभव आपण करू शकत नाही जसे सूर्यापुढे ढग आल्याने आपण सूर्याचा अनुभव करू शकत नाही. आपल्यातील पूर्णत्वाच्या ज्ञानाची प्राप्ति म्हणजेच मुक्ती! सृष्टीचे मूळ जाणून घेतल्याने समस्त विश्वाच्या प्रपंचाचे रहस्य ज्ञात होते. सगळा भ्रम– विभ्रम मिटून जातो. मनुष्य शांत होतो, तृप्त होतो. तो समस्त जीवनाकडे साक्षीभावाने पाहू लागतो. संसाराच्या बंधनातून मग तो मुक्त होतो. तो स्वतंत्र होतो. जीवनाची ही परमोच्च स्थिती आहे. ही स्थिती उचित आत्मज्ञानानेच प्राप्त होते.

आत्मज्ञानासाठी वैराग्याची आवश्यकता असते. वैराग्याचा अर्थ संसाराचा त्याग नव्हे. तर संसारातील आसक्तींचा त्याग. संसार हा कधीच बंधन नसतो. त्या संसाराबद्दलच्या अभिलाषा, आसक्ती म्हणजे बंधने. आणि ह्या आसक्तीचे मूळ कारण आहे आपला अहंकार.

जनक राजाला हे तीन प्रश्न पडले याचा अर्थच मुळी त्याच्यातील ह्या ज्ञानाची जिज्ञासा जागृत झाली. ह्या जिज्ञासे बरोबरच आपल्या गुरूपुढे शरणागति स्विकारल्याने जनक राजा ह्या अवस्थेला प्राप्त झाला. स्वत:तील जिज्ञासेचा अभाव, स्वत:च्या पात्रतेचा अभाव आणि आयुष्यात सदगुरूचा अभाव या तीन गोष्टींपोटी सामान्य माणूस ह्या ज्ञानापासून वंचित राहतो.

## अध्याय पहिला – (सूत्र २)

### अष्टावक्र उवाच

**मुक्तिमिच्छसि चेत्तात् विषयान् विषवत्यज ।**
**क्षमार्ज्जवदयातोषं सत्यं पियूषवद् भज ॥२॥**

**अर्थ:** अष्टावक्र म्हणाले, "हे प्रिय (शिष्या), जर तू मुक्तीचा ध्यास करत असशील तर विषयांना विष समजून त्यांचा त्याग कर, आणि क्षमा, आर्जव, दया, समाधान आणि सत्य ह्या गोष्टींना अमृत समजून त्यांचे सेवन कर."

येथे अष्टावक्रांनी एका वाक्यातच वैराग्याचे रहस्य उलगडून सांगितले. तुला जर मुक्ती प्रिय असेल तर विषय–वासनांचा ते विष असल्यासारखा त्याग कर. प्रश्न केवळ विषय वासनांचाच नाही तर त्यांच्या मोहापायी विषयासक्त होणे हे त्याज्य आहे. आसक्तीचा त्याग होणे जरूरी आहे. कोठलीच गोष्ट अध्यात्म्याच्या वाटेवर बाधा बनू शकत नाही जर आपण त्या त्या गोष्टींमध्ये गुंतलो नाही तर. विषयांचे सोडणे म्हणजे घर, संसार, खाणे, पिणे, कपडे–लत्ते यांचा त्याग करून भणंग बनणे नव्हे. ह्या सगळ्या विषयांबद्दलची आसक्ती सोडणे म्हणजे वैराग्य. बरे नुसते विषयांच्या आसक्तींच्या त्यागाने मुक्ती मिळते असे म्हणणेही रास्त नव्हे. ह्या त्यागाने आपण मुक्ती प्राप्त करण्याच्या पात्रतेचे होतो. आणि केवळ विषयासक्तीचा त्याग करण्यापेक्षा त्याबद्दल आपल्या अस्तित्वामध्ये क्षमा, दया, आर्जव, समाधान आणि सत्य अशा सकारात्मक गोष्टींचा स्विकार करणे आणि तेच अमृत समजून त्याचे पान करणे हे मुक्तीच्या दिशेने पहिले पाऊल ठरेल.

## अध्याय पहिला – (सूत्र ३)

**न पृथिवी न जलं नाग्निर्न वायुर्द्यौर्न वा भवान् ।**
**एषां साक्षिणमात्मामं चिद्रूपं विद्धि मुक्तये ॥ ३ ॥**

**अर्थ:** तू पृथ्वी नाहीस, तू जल नाहीस, ना तू अग्नि आहेस, ना वायु, आकाशही नाही. मुक्तीसाठी स्वत:ला या सगळ्यांचा एकचैतन्यरूपी साक्षीदार आहेस असे मान.

जनक राजाचा पहिला प्रश्न होता कि ज्ञानाची प्राप्ति कशी होईल. परंतु अष्टावक्रांनी त्याला वैराग्याची व्याख्या पहिल्यांदा ऐकवली कारण ज्ञान प्राप्तिसाठी वैराग्य असणे फार आवश्यक आहे. ह्या श्लोकात मात्र त्यांनी जनकाला आपल्या निज स्वरूपाची ओळख द्यायला सुरूवात केली आहे. मनुष्य म्हणजे केवळ शरीरमात्र नाही तर तो एक अमर्याद, अविरत, अनादि आणि अनंत असा आत्मा आहे असे ते म्हणत आहेत. शरीर, मन, बुद्धी या सगळ्या गोष्टी त्या आत्म्याच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत. आत्मा हाच सर्वस्वी त्यांचा धनी आहे. परंतु मानवी मनाला आणि इंद्रियांना केवळ स्थूलाचाच अनुभव करता येत असल्याने आपण इतर गोष्टींना सत्य मानून अदृश्य, अननुभूत आत्म्याला नाकारतो आहोत. पंच महाभूतेसुद्धा अनित्य आहेत, भौतिक आहेत, विनाशी आहेत. त्यांनी केवळ तुझे शरीररूपी वस्त्र बनवले आहे. ते वस्त्र बदलून दुसऱ्या जन्माला जाणारा नित्य आत्मा तू आहेस. वस्त्रे तुझी ओळख नाहीत. तू घर नाही आहेस, त्या घरात राहणारा मालक आहेस. जन्मोजन्मी तू आपल्या स्थूल शरीरालाच स्वत:चे अस्तित्व मानत आल्यामुळेच तुझा आभास जात नाही आहे. हा तुझ्या अस्तित्वातील विक्षेप नावाचा संस्कार आहे. त्यातून तू मुक्त हो व स्वत:ची खरी ओळख करून घे. माझे, माझे जे तू म्हणत आहेस ते तू नव्हेस, ते फक्त तुझे आहे . ते सोडून देण्यानेच तुला आपल्या स्वभावाची ओळख होईल. आत्मसाक्षात्कार होईल.

आतापर्यंत आपण जनक राजाच्या तीन पैकी दोन प्रश्नांना दिलेली उत्तरे ऐकलीत. पुढच्या लेखांकात अष्टावक्र गीतेच्या पुढील श्लोकांचा अभ्यास करू.

## (१) आश्रमातील दीपावली:



आश्रमातील दीपावली हा तर दरवर्षी येणारा महोत्सव. या वर्षी कोरोनाच्या वादळाने जसे इतर सण गिळून टाकले तसेच दीपावलीच्या बाबतीतही थोडेफार घडले. मठ, आश्रम, देवळे, प्रार्थनास्थळे यांवरील बंधनांमुळे केवळ सेवेकऱ्यांनाच मठात प्रवेश उपलब्ध होता. त्यामुळे इच्छा असूनही बरेचसे साधक मठात नेहमीप्रमाणे पोहोचू शकले नाहीत. परंतु उपलब्ध सेवेकऱ्यांनी स्थानिक साधकांच्या मदतीने दिवाळीचा सण तसा दिव्यांची आरास, भाऊबीज, फराळ इत्यादि गोष्टींच्या द्वारे साजरा केला. कालींदीच्या अकाली मृत्युचे सावटही दिवाळीवर पसरले असल्याने मठातील दिपावली तशी थोडीशी मंदच झाली.





## (२) देवरूख साधक पेठेचा नविन प्रकल्प




कोरोना महामारीने केवळ मनुष्याच्या शारीरिक स्वास्थ्यावरच नाही तर आर्थिक पैलुंवर पण जबरदस्त आघात केला. गावागावात बरेचसे छोटे व्यवसाय मंदावले किंवा बंदही पडले. देवरूख गावातील साधकांना उत्पन्नाचे साधन मिळावे या दृष्टीने गुरुजींच्या संकल्पाने देवरूख साधक पेठेची स्थापना करण्यात आली व देवरूखात बनणाऱ्या दैनंदिन संसाराला लागणाऱ्या गोष्टी शहरातल्या साधकांनी घ्याव्यात या विचाराने देवरूख साधक पेठेची स्थापना झाली. दिवाळीनिमित्त वेगवेगळ्या स्थानिक साधकांकडून फराळाचे जिन्नस, तसेच स्थानिक कलाकारांनी बनवलेले कंदील, रांगोळ्या, मातीचे दिवे इत्यादि गोष्टी एकत्र करून दिवाळी बॉक्स बनवले गेले व भारतातील तसेच परदेशातील साधारण १०० साधकांनी या योजनेला हातभार लावला व देवरूख साधक पेठेचा हा उद्योग यशस्वी करण्याची मुहुर्तमेढ केली. २०२१ च्या जानेवारीपासून दैनंदिन जीवनाला लागणाऱ्या मसाले, धान्य, हातांनी दळलेली पीठे इत्यदि गोष्टींचा "देवरूख बास्केट" नावाने पुरवठा करण्याची योजना राबविण्यात येईल, त्याचाही लाभ आपले साधक घेतील अशी अपेक्षा आहे.




# समुद्र भरला आहे, पाहीजे तेवढे घ्या...


समुद्र भरला आहे, पाहीजे तेवढे घ्या हे स्वामींचे एक आवडते वाक्य होते. समुद्र म्हणजे अथांग असा पाण्याचा समुच्चय. त्यातून कितीही पाणी काढले तरी तो भरलेलाच असतो. तो यत्किंचितही कमी होत नाही, जणु काही कुबेराचे भांडारच वेदांनी ज्या विश्वचैतन्याचे वर्णन पूर्णात पूर्णमिदं.. असे केले तसेच काहीसे. त्यात कितीही घातले किंवा काढले तरी त्याला काहीच फरक पडत नाही.

श्री स्वामी समर्थांचे सामर्थ्य आणि अस्तित्वच समुद्रासारखे विशाल आणि अथांग होते. ते पूर्णब्रह्म होते. त्यांच्याकडून कितीही आपण घेतले तरीही त्यांचे अस्तित्व सातत्याने वाढतच होते. ते कृपेचे भांडार होते. ते कल्पवृक्षासारखे अमर्याद आणि असीम होते. आपण जे मागावे ते देण्याचे अफाट सामर्थ्य त्यांजजवळ होते. प्रश्न त्यांच्या देण्याच्या मर्यादांचा कधीच नाही. प्रश्न आहे तो आपली झोळी मर्यादित आहे. फाटकी आहे. आपले मागणेही खूप संकुचित आहे. स्वामींची अमर्याद कृपा झेलण्याचे सामर्थ्य आपल्याकडे नाही.

समुद्राबाबतची दुसरी गोष्ट म्हणजे समुद्र सगळेच आणि सगळ्यांनाच सामावून घेतो. आकाशात पतितं तोयं यथा गच्छति सागरम्.. अगदी गंगेसारख्या शुद्ध, पवित्र नदीपासून एखाद्या शहरातील गटारगंगेसारख्या दूषित पाण्याला समुद्र तेवढ्याच प्रेमाने सामावून घेतो. तो कोणालाच आणि कशालाच नाकारत नाही. आणि हे सगळे करताना एखाद्या सिद्ध पुरूषासारखा तो स्वतः दूषित न होता आपल्या सान्निध्यात आलेल्यांना आपल्यासारखेच बनवतो. सगळी मलीनता स्वत:मध्ये सामावत फक्त शुद्ध पाण्याची वाफ सूर्य आणि वायु यांच्या मदतीने करत सगळ्या जगावर शुद्ध पाण्याचाच वर्षाव करतो. सगळ्यांची पापे आपल्या पोटात घेऊन जगाला फक्त पाण्याच्या रूपाने आशिर्वादच देतो. त्या बरसणाऱ्या पावसातील किती आणि कसे घ्यायचे हे आपल्या स्विकारण्याच्या क्षमतेवर अवलंबून. अगदी कवितेतील घेता किती घेशील दो करांने या सारखे.

# आगामी उपक्रम: रेकि शिबिरे

| दिनांक | रेकि शिक्षक | केंद्र/स्थान | श्रेणी | नोंदणीसाठी संपर्क |
|---|---|---|---|---|
| २ व ३ डिसेंबर | विशाल / कल्पिता | करूळ | १ली | गिरीश कर्णिक (९८२०२६०२२९) |
| ५ व ६ डिसेंबर | विशाल/कल्पिता/जयराम | कुडाळ | १ली | प्रकाश भोगटे (८९५६५०२०३९) |
| १२ व १३ डिसेंबर | अजित सर | पुणे | २री | अमृत कीरपेकर (९९६०१०१०१८) |
| १२ व १३ डिसेंबर | संगिता कुळकर्णी | वडोदरा | १ली | चंद्रेशभाई परमार (९९७४७०१२००) |



## अग्निहोत्राचे आद्य प्रणेते श्री वसंतराव परांजपे यांचा संदेश

आजपर्यंतच्या काळातील जगाच्या दृष्टीने हा सर्वात कठीण काळ. जे जे काही मी पूर्वी सुचवले होते ते होण्याचा हा काळ. ज्यांना मी हे आधी सांगितले आहे त्यांना यात आश्चर्य वाटणार नाही. सर्वांनीच येणाऱ्या परिस्थितीला आणि परिणामांना प्रतिक्रिया देताना सावधान. स्वत:वरती संयम ठेवा, हृदय शांत ठेवा, मन शुद्ध ठेवा, आणि सगळे एकत्र रहा.

हा काळ सगळ्यांमध्येच भेद करणारा असेल. भावा–भावांमध्ये लढाया होतील, देशा–देशांमध्ये लढाया होतील, वंशभेद वाढीला लागेल. आणि हे सगळे थोड्याच काळात घडेल.

तुमचे शील जर चांगले असेल आणि श्रद्धा दृढ असेल तर ह्या कठीण काळातून तुम्ही सहजपणे बाहेर पडाल.

प्रत्येक परपुरूषाचा बंधू म्हणून आदर करा.

प्रत्येक परस्त्रीचा भगिनी म्हणून आदर करा.

राजकीय पक्षांच्या मतप्रणालीत आणि निर्बुद्ध गोष्टींमध्ये गुंतून पडू नका.

भयाला बळी पडू नका.

हा काळ फार टिकणारा नाही.

लवकरच प्रकाश नजरेला पडेल.

हृदय स्थिर ठेवा.

प्रकाशाच्या क्षेत्रात शिरा. प्रकाशाच्या दिशेने चालत रहा.

आपल्या प्रिय व्यक्तींना जवळ करा आणि एकमेकांच्या साथीने पुढे चला.

प्रेम अटळ असू दे.

एकता अटळ असू दे

ज्ञान आणि कृपा अटळ असू दे.

ह्या अश्या अस्थिर काळात सत्याची आणि पूर्णत्वाची कास सोडू नका.

तुम्हा सर्वांवर आशिर्वाद आहेतच.

प्रेम पूर्वक

**ओम तत् सत्**